अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निधी कार्यक्रम (एन.आर.एस.ई) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७/प्र.क्र.२६२/ ऊर्जा-७.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०५ जानेवारी, २०१८.

वाचा :-

१. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७.
२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७.
३. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचे क्रमांक:लेखा/बीपी-००६/एन.आर.एस.ई/१७-१८/२५६९, दिनांक १९/६/२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

महाऊर्जा कार्यालयाने संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक १९/६/२०१७ च्या पत्रान्वये “मागणी क्रमांक के-६, २८१०-अपारंपारिक ऊर्जा साधने” याखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून निधी वितरीत करण्यात यावा, अशी विनंती शासनास केली होती. त्यानुषंगाने, वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ व २ च्या परिपत्रकास अनुसरुन, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण(महाऊर्जा) पुणे यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु.२२.०० कोटी इतक्या मंजूर असलेल्या निधीतून, अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निधी कार्यक्रम (एन.आर.एस.ई) अंतर्गत ७०% च्या मर्यादेत रु.१५.४० कोटी इतका निधी वितरीत करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांनी केलेल्या विनंतीनुसार, अपारंपारिक हरित ऊर्जा स्त्रोत निधी कार्यक्रम (एन.आर.एस.ई) अंतर्गत सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या योजनांच्या / प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,पुणे यांना रुपये १५,४०,००,०००/-(रुपये पंधरा कोटी चाळीस लाख फक्त) इतका निधी वितरित करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री.अ.मा.आत्राम, सह सचिव (ऊर्जा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्री. वि.म.राजूरकर, अवर सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,पुणे (Director General, Maharashtra Energy Development Agency, Pune) यांच्या नावे अदा करण्यात यावा.

४. अपारंपारिक ऊर्जा साधने अंतर्गत विविध योजनेवरील खर्चाचा, उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या निधीची रक्कम केवळ अपारंपारिक हरित ऊर्जा स्त्रोत निधी कार्यक्रम (एन.आर.एस.ई) अंतर्गत विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी सहाय्यक संचालक (लेखा),महाऊर्जा यांची राहिल.

६. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने आवश्यक तेव्हा महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

७. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक के-६, २८१० अपारंपारिक ऊर्जा साधने, ८०० इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजना (००)(०१) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (२८१० ००३४), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निधी कार्यक्रम (एन.आर.एस.ई) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांना निधी वितरीत करताना शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ च्या परिशिष्टातील अ.क्र. ३ व ९ मधील तपासणी सूचीमधील अटींची व शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७ मधील परि.क्र. ७ ते १८ मधील प्रत्येक अटीची पूर्तता होत आहे.

९. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र क्र ३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/४/२०१५ च्या परिशिष्टानुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका,१९७८ (भाग-पहिला) (उपविभाग-तीन) तसेच महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारातील भाग पहिला, उप विभाग (तीन), अनुक्रमांक ४, परिच्छेद २७ (२) नुसार (अ), योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देणे (वित्तीय मंजूरी धरुन) याबाबत अनावर्ती खर्चाच्या रु.५ कोटी किंवा आवर्ती खर्चाच्या बाबतीत वार्षिक रु.५० लक्ष पर्यंत मंजूरी देण्याचे पूर्ण अधिकार,सदर प्रपत्राच्या रकाना (६) मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधिनतेने, मंत्रालयीन प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेले आहेत.

१०. सदर शासन निर्णय, शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ व शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र क्र ३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/४/२०१५ च्या परिशिष्टानुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका,१९७८ (भाग-पहिला) (उपविभाग-तीन) तसेच महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारातील भाग पहिला, उप विभाग (तीन), अनुक्रमांक ४, परिच्छेद २७(२) नुसार (अ), विभागांना दिलेल्या अधिकारीतेत निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०१०५१३५६१७५३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c1327133a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2018.01.05 14:00:38 +05'30'

(प्र पु.बडगेरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे म्हाडा कमर्शियल कॅाम्प्लेक्स, सर्व्हे नं. १९१-ए- फेज, येरवडा, पुणे- ४११ ००६.
२.महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा),मुंबई- ४०० ००१
३.महालेखापाल, महाराष्ट्र-२,(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा),नागपूर
४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

६.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७.आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८.अवर सचिव(रोख/प्रशासन), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई.३२
९.अवर सचिव(ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०.निवड नस्ती, ऊर्जा-७.

परिशिष्ट

१. **कृषि अवशेषांपासून ब्रिकेट/ पेलेट/कांडी कोळसा संयंत्र उभारण्याची योजना:-**

सन २०१७-१८ मधील प्रस्तावित बायोमास ब्रिकेट प्रकल्पांची यादी व एकूण मागणी रु. ८६.६०६७२ (रुपये लक्षमध्ये)

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	सयंत्राची किंमत (रु. लक्ष)	पात्र अनुदान (संयंत्र किंमतीच्या २०%) (रु. लक्ष)
१	मे. ग्रिनेक्स ॲग्रो इंडस्ट्रीज्, गट नं. ३००, मौजे- थिलोरी, ता. दर्यापूर, जि. अमरावती - ४४४८०३	२०.५०	४.०
२	मे. सुयश इंडस्ट्रिज, स.नं. ७२८/१, प्लॉट नं.१९, दाभाडी, ता. मालेगाव, जि. नाशिक	२१.००	४.००
३	मे. जी. व्ही. सॉ मिल प्लॉट नं. के ३१/१/बी एम.आय.डी.सी. हिंगणा रोड, ता. हिंगणा, जि. नागपूर-४४००२८	१७.५०	३.५
४	मे. ग्रीन ड्रिम बायोकोल प्रा. लि. गट नं. ३७३, डोंगरगाव (क), ता. फुलंब्री,जि. औरंगाबाद	२०.२५	४.००
५	मे. राजशील इंडस्ट्रीज, प्लॉट नं. इ-१, इस्लामपूर एम.आय.डी.सी., ता. वाळवा, जि.सांगली-४१५४०९	१४.५१	२.९०२
६	मे. साई बायो केअर प्लॉट नं. ३१, श्रेय नगर,नवीन उस्मानपुरा समोर श्रेयसबालाक मंदिर औरंगाबाद	१५.३२६२३	३.०६५२४
७	मे. ओम साई व्हाईट कोल इंडस्ट्रीजस्, कांचनपूर, गट नं. १४ मु.पो अगर, ता. व जि. अकोला	१८.००	३.६०
८	मे. नाथ ॲग्रो प्रोसेसिंग, गट नं. ३१५/१, मुंबई-आग्रा हायवे,वडाळी- भुई, ता. चिंचवड, जि. नाशिक-४२३११७	२१.००	४.००
९	पंचशिल मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या., ता. खामगांव जि. बुलडाणा-४४३१०२	२०.००	४.००
१०	मे. त्रिदिप बायोफ्युअल मॅन्युफॅक्चरिंग प्लांट सनगाव, मु.पो. लोखंडी सावरगाव, ता. अंबेजोगाई, जि. बीड- ४३१५१७	१५.१९६०	३.०३९२०
११	मे. भारत ब्रिक्वेट्स सर्व्हे नं. ३०, गट नं. १३३, येलकी ता. अचलपूर, जि. अमरावती	१७.४०	३.४८
१२	मे. श्री बालाजी इंडस्ट्रीज् प्लॉट नं. ए-२१/१, मिनी इंस्ट्रीअल एरिया, एम.आय.डी.सी. ता. पातुर, जि. अकोला	१४.३४३७४	२.८६८७४
१३	मे. ए.के. एनर्जीज गट नं. १४१/फ, गंगापूर कायगांव रोड, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४३१११२	१६.८२०५०	३.३६४१०

१४	मे. श्री साबजी ॲग्रोटेक सर्व्हे नं. ९०१/1बी मौजे ईसापूर ता. देवळी, जि. वर्धा- ४४२१०१	२१.७४४९३	४.००
१५	बालाजी बायो फ्युअल्स गट नं. ८९, घोसापूरी, एन.एच-२११, कुमशी रोड, आर.टी.ओ. ऑफिस ता. व जि. बीड	१३.८०	२.७६
१६	साई समर्थ इंटरप्राईजेस गट नं. ५३, भोकर, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर-४३११३६	१३.३१	२.६६२००
१७	ओम ॲग्रो इंटस्ट्रीजस् गट नं. ३७/३, मु.पो. वाहेगाव ता. पैठण, जि. औरंगाबाद	१४.७६००	२.९५२००
१८	मे. साईकृपा ॲग्रो गट नं. ३३६, धवलगाव, श्रीगोंदा, अहमदनगर	२०.००	४.००
१९	मे. श्री राम ॲग्रो इंटस्ट्रीजस् प्लॉट नं. सी-५६, इंटस्ट्रीअल एरिया एमआयडीसी, खानापूर देगलूर, जि. नांदेड	१८.२५	३.६५
२०	एसपीएस इकोटेक प्रा. लि. प्लॉट नं. बी-३६, एमआयडीसी-विटा ग्रोथ सेंटर, इंडस्ट्रीअल एरिया, ता. खानापूर, जि. सांगली	१३.४२६६३	२.६८५३२
२१	मे. सेवा बायो ब्रिकेटस गट नं. ७७, देवटे, लाडजळगाव, ता. शेवगाव जि. अहमदनगर	१४.५१०००	२.९०२००
२२	मे. मांगल्य ब्रिक्वेटींग गट नं. ९०/अ, आयटीआयजवळ, टाकडगाव रोड, गेवराई, जि. बीड- ४३११२७	१५.५००	३.१०
२३	मे. श्री सतगुरु ॲग्रोटेक, सर्वे नं. १८१/१ मोर्शी चांदूरबाजार रोड, गाव-खानापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती-४४४९०५	१६.६४००	३.३२८००
२४	मे. चांडक ब्रिकेटस सर्व्हे नं. १४९ मौजा- अंजी (मोठी), ता. व जि. वर्धा	१४.४१७५०	२.८८३५०
२५	मे. बालाजी ॲग्रो इंटस्ट्रीजस् बी-८, एमआयडीसी एरिया, ता. जिंतूर, जि. परभणी	१४.४२५००	२.८८५००
२६	मे. वर्मा ट्रेडर्स प्लॉट क्र. ८५/८६ सहकारी औद्योगिक इस्टेट ता. जामनेर जि. जळगाव	१४.८९८११	२.९७९६२
	एकूण	४३७.५२८६४	**८६.६०६७२**

२.अपारंपारिक ऊर्जा प्रसारण व प्रसिध्दी कार्यक्रम

एकुण मागणी रु. १२५ लाख **(रु. लक्षमध्ये)**

अ.क्र.	प्रस्ताव	एकूण मागणी
१	प्रदर्शन /प्रायोजकत्व	५.००
२	होर्डिंग	१५.००
३	बस स्टॉप शेल्टर	२०.००
४	बसबॅक पॅनल	२०.००
५	डिजीटल सिनेमा	२०.००
६	टि.व्ही. चॅनल	३०.००
७	प्रिंट मिडिया	५.००
८	रेडिओ जिंगल	०.००
९	विविध प्रसार माध्यमाव्दारे प्रसिध्दी	१०.००
	एकुण	१२५.००

३.ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रम-

या योजनेअंतर्गत प्रत्येक घरामध्ये १ सौर घरगुती दिवे प्रकार २ चे सयंत्र आस्थापित केले जाते. यामध्ये ९ वॅटचे २ सीएफएल दिवे, ३ वॅटचे १ एलईडी दिवा, ३७ वॅटचे सोलर पॅनल व ४० AH ची बॅटरीचा समावेश आहे. त्याची अंदाजीत प्रती नग किंमत रु. ८,०००/- इतकी असते. तसेच १० घरांकरिता १ सौर पथदीप आस्थापित केले जाते. त्याची किंमत अंदाजे प्रती नग रु. १६,०००/- इतकी असते. यानुसार सदर योजनेंतर्गत एकूण मागणी रु. १.००.८६ कोटी इतकी असली तरी निधी वितरण रु.१.०० कोटी इतक्या मर्यादेत करण्यात येत आहे.

(रु.लाखात)

अ. क्र.	जिल्हा	तालुका	गावाचे नाव	अंदाजित घरांची संख्या	अंदाजपत्रकीय किंमत १.सौर घरगुती दिवा २.सौर पथदिवा (१ + २)
१	गडचिरोली	भामरागड	मर्दहुर	१७	१.६३
२	गडचिरोली	एटापल्ली	तोटगट्टा (तोडगट्टा)	४२	४.०२
३	गडचिरोली	कोरची	नाडेकल	१५	१.४४
४	गडचिरोली	अहेरी	कल्लेड एम.	५६	५.३६
५	गडचिरोली	अहेरी	कोजेड	४२	४.०२
६	गडचिरोली	भामरागड	फोंदेवाडा	२०	१.९२
७	गडचिरोली	भामरागड	मुत्तेनकुही	१	०.९६
८	गडचिरोली	एटापल्ली	कुंजेमरका	२९	२.७८
९	गडचिरोली	एटापल्ली	हिंदुर	३०	२.८७
१०	गडचिरोली	भामरागड	विसामुंडी	९९	९.४८
११	नंदुरबार	धडगाव	सिंधवाणी	१५२	१४.५६
१२	नंदुरबार	धडगाव	फलाई	१६७	१६.००
१३	नंदुरबार	धडगाव	गोराडी	५८	५.५५
१४	नंदुरबार	धडगाव	लेकडा	४७	४.५
१५	नंदुरबार	धडगाव	पिंपळचोप	२९	२.७८
१६	नंदुरबार	धडगाव	माळ	११४	१०.९२
१७	नंदुरबार	धडगाव	तिनसमल	१२६	१२.०७
			एकूण		**१००.८६**

४.शासकीय / निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींवर सौर विद्युत संच (सोलर पॉवर प्लँट) आस्थापित करणे :

सदर योजनेंतर्गत एकूण मागणी रु.४.०५ कोटी असली तरी निधी वितरण रु.४.०० कोटी इतक्या मर्यादेत वितरीत करण्यात येत आहे.

अ. क्र.	प्रकल्पाचे ठिकाण	एकूण क्षमता (कि.वॅ.)	अंदाजपत्रकीय किंमत (रु. लाखात)
१.	यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास प्रबोधिनी (यशदा), राजभवन संकुल, बाणेर रोड, पुणे.	२०	२७.००
२.	वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर.	२०	२७.००
३.	राष्ट्रीय कृषि पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT), स. नं. ३९८-४००, सीआरपीएफ कॅम्पस पुढे, पुणे-मुंबई महामार्ग, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे.	२०	२७.००
४.	महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक.	२०	२७.००
५.	डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, संत गाडगेबाबा विद्यापीठ रोड, तपोवन गेटजवळ, अमरावती	२०	२७.००
६.	मुख्यमंत्री निवास वर्षा बंगला मुंबई, नेपीअन सी रोड, वसंत विहार, मलबार हिल, मुंबई.	२०	२७.००
७.	रामगिरी बंगला, नागपूर	२०	२७.००
८.	पोलिस आयुक्तालय, पुणे	२०	२७.००
९.	जिल्हा परिषद, लातूर	२०	२७.००
१०.	जिल्हा परिषद, नंदुरबार	२०	२७.००
११.	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय , अमरावती	१०	१३.५०
१२.	एस.आर.पी.एफ., औरंगाबाद	१०	१३.५०
१३.	पंचायत समिती निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर	१०	१३.५०
१४.	पंचायत समिती, राजापूर, जि. रत्नागिरी	१०	१३.५०
१५.	चतु:श्रृंगी पोलिस स्टेशन, पुणे	१०	१३.५०
१६.	प्राथमिक आरोग्य केंद्र, भांडारबोडी, ता. रामटेक, नागपूर	०५	६.७५
१७.	प्राथमिक आरोग्य केंद्र, गिरड, ता. समुद्रपूर, वर्धा	०५	६.७५
१८.	प्राथमिक आरोग्य केंद्र, मुरुमगांव, ता. धानोरा, गडचिरोली	०५	६.७५
१९.	प्राथमिक आरोग्य केंद्र, टेकडाटाला, ता. सिरोंचा, गडचिरोली	०५	६.७५
२०.	प्राथमिक आरोग्य केंद्र, देलचीपेठ्ठा, ता. अहेरी, गडचिरोली	०५	६.७५
२१.	प्राथमिक आरोग्य केंद्र, कोटगुल, ता. कोरची, गडचिरोली	०५	६.७५
२२.	प्राथमिक आरोग्य केंद्र, तोहगाव, ता. गोंडपिंपरी, चंद्रपूर	०५	६.७५
२३.	प्राथमिक आरोग्य केंद्र, मुरमाडी, ता. लाखनी, भंडारा	०५	६.७५
२४.	प्राथमिक आरोग्य केंद्र, यावरला, ता. पवनी, भंडारा	०५	६.७५
२५.	प्राथमिक आरोग्य केंद्र, धोनाडी, ता. देवरी, गोंदीया.	०५	६.७५
	एकूण :-	**३००**	**४०५.००**

२५ शासकीय इमारती = ३०० कि. वॅ. x १३५ प्रति किलो वॅट = रु.४.०५ कोटी (रुपये चार कोटी पाच लक्ष)

५. **वारामापन केंद्र उभारणी व निष्कासन**

एकूण मागणी रु.१.२५ कोटी निधी **(रुपये लक्षमध्ये)**

अ. क्र.	वारामापन केंद्राचा तपशील	एकूण वारामापन केंद्रे	प्रति वारामापन केंद्र खर्च	एकूण रक्कम
१	१०० / ८० मी. उंचीचे वारामापन केंद्र उभारणी	५	७.५०	३७.५०
२	वारामापन केंद्रासाठी उपकरण	५	६.००	३०.००
३	जागेचे भाडे व देखभाल	२०	१४.५५	२९.१०
४	नीवे, चेन्नई यांच्याकडून वारामापन केंद्राचा अहवाल तयार करण्यासाठी	६	२.००	१२.००
५	अभ्यास पूर्ण झालेले ८० मी. उंचीचे केंद्र काढणे व वाहतूक	१५	०.८०	१२.००
६	वारामपान केंद्र उपकरण (सेंसर बदलणे)	४	१.००	४.००
७	वारामापन केंद्राची चीप कलेक्शन	२०	०.०२	०.४०
	एकूण			**१२५.००**

- प्रस्तावित वारामापन केंद्राचे ठिकाण (उपलब्ध जागेनुसार ठिकाण निश्चित करण्यात येईल)

अ. क्र.	ठिकाण	तालुका	जिल्हा
१	कनोली बारा	हिंगणा	नागपूर
२	मोरगवान	रिसोड	वाशिम
३	पंगरीमाळा	देऊळगाव	बुलढाणा
४	मळकारंजा	कळंब	उस्मानाबाद
५	पेंडाकळे	शाहुवाडी	कोल्हापूर
६	मोंडबापर्डे	देवगड	सिंधुदुर्ग
७	नरकेवाडी	राजापूर	रत्नागिरी
८	आधारवाडी	सिल्लोड	औरंगाबाद
९	नरवणे	माण	सातारा
१०	घाटगर	जुन्नर	पुणे

६. **सौर प्रारण मापन केंद्र स्थापन योजना**

या योजनेंतर्गत वसंतराव नाईक कृषी विदयापीठ, परभणी येथे सौर प्रारण मापन केंद्र स्थापनेसाठी रु.५०.७४ लक्षाची मागणी महाऊर्जाने केलेली आहे.

७. ऊर्जा संवर्धन कार्यक्रम

ऊर्जा संवर्धन कार्यक्रमासाठी खालील प्रस्तावानुसार रु.१२.०० कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

(रुपये लक्षमध्ये)

अ.क्र.	प्रस्तावाचे नाव	एकूण खर्च
१	ऊर्जा बचत कार्यक्रम (सविस्तर ऊर्जा परीक्षण)	६०.००
२	प्राथमिक ऊर्जा परिक्षण योजना	१५.००
३	निष्कासित उष्णतेचे पुर्नजीवन योजना	५.००
४	राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पारितोषिक योजना	२०.००
५	ऊर्जा संवर्धन जनजागृती अभियान योजना	५०.००
६	ग्रामपंचायतीसाठी ऊर्जा कार्यक्षम पथदिवे (एल.ई.डी.) योजना	४००.००
७	शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतींमध्ये ऊर्जा सवंर्धनास चालना देण्यासाठी ऊर्जा सवंर्धन तंत्रज्ञान पथदशीर्य प्रकल्प राबविणे.	४००.००
८	नगरपालिका, महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये ऊर्जा बचतीसाठी संयंत्रे आस्थापित करणे.	२५०.००
	एकूण	१२००.००